अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव
Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028
वरुड | बुधवार
०१.०७.२०२६
वरुड दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा
RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485
वर्ष: ०७ | अंक: १५१ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२
संपादक - चंद्रकांत भा. भड
+91 7745067712

# विधानपरिषदेच्या उपसभापतीपदी सचिन अहिर बिनविरोध

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी 'अहिर' शब्दाचा अर्थ सांगितला, शिंदेंची शेरोशायरी



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – विधानपरिषदेच्या उपसभापती पदावर शिवसेनेचे सचिन अहिर यांची बुधवारी बिनविरोध निवड झाली. या पदासाठी उबाठा गटाकडून ज.मो. अभ्यंकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता.

मात्र, विधानपरिषद सभागृहाची परंपरा कायम राखण्यासाठी ही निवडणूक बिनविरोध व्हावी, अशी विनंती संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली. त्यानुसार, सभागृहातील संख्याबळ आणि सभागृहाची परंपरा कायम राखण्यासाठी आमचा प्रस्ताव मागे घेण्याची विनंती सूचक आणि अनुमोदकांना करीत असल्याचे आमदार अनिल परब यांनी जाहीर केले.

सहा खासदारांनंतर विधान परिषेदेतील आमदार सचिन अहिर यांना सोबत घेत शिवसेना मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आठवडाभरात दुसऱ्यांदा उबाठाला जोरदार झटका दिला. विधानपरिषद आमदार तथा आदित्य ठाकरे यांचे शिलेदार सचिन अहिर यांनी ठाकरेंची साथ सोडत मंगळवारी, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून उपसभापती पदाचा अर्ज दाखल केला. उपसभापती पदासाठी अहिर यांचा अर्ज दाखल करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, मंत्री चंद्रकांत पाटील, मंत्री संजय शिरसाट, आमदार कृपाल तुमाने, मनिषा कायंदे, दुष्यंत चतुर्वेदी, चंद्रकांत रघुवंशी आणि इतर लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

त्याचवेळी महाविकास आघाडीच्या वतीने उबाठाचे आमदार ज.मो. अभ्यंकर यांनीही या पदासाठी अर्ज दाखल केला.

## दिल्ली-मुंबई एक्सप्रेसवेवर भीषण अपघात

# ट्रकला धडकून बसला आग, ८ जणांचा मृत्यू, अनेक जखमी





(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**राजस्थान** – दिल्ली-मुंबई एक्सप्रेसवेवर बुधवारी (दि.१) पहाटे भीषण अपघात झाला. प्रवासी बसने पुढे जाणाऱ्या ट्रकला मागून धडक दिल्यानंतर दोन्ही वाहनांना आग लागली. या भीषण दुर्घटनेत ८ जणांचा मृत्यू झाला, तर अनेकजण जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, अपघातानंतर घटनास्थळी युद्धपातळीवर बचावकार्य राबवण्यात आले.

दौसा जिल्ह्यातील धनावडा परिसरात अपघात ही दुर्घटना राजस्थानमधील दौसा जिल्ह्यात कोलवा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील धनावडा परिसरात घडली. हंस ट्रॅव्हल्सची ही बस ऋषिकेशहून मध्य प्रदेशातील इंदूरकडे जात होती. द्रुतगती मार्गावर पुढे जाणाऱ्या ट्रकला बसने मागून धडक दिल्यानंतर दोन्ही वाहनांनी पेट घेतला.

८ जणांचा मृत्यू, २४ जखमी दौसा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक पियुष दीक्षित यांनी दिलेल्या माहितीनुसार, पाच जणांचा आगीत होरपळून मृत्यू झाला. दोन जणांचा डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने घटनास्थळीच मृत्यू झाला, तर आणखी एकाचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. अपघातातील २४ जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

प्रवाशांमध्ये गोंधळ धडकेनंतर काही क्षणांतच बस आणि ट्रकला आग लागल्याने प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. अग्निशमन दल, पोलीस आणि स्थानिक प्रशासनाने घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवले आणि बचावकार्य सुरू केले. त्यानंतर जखमींना बाहेर काढून रुग्णालयात हलवण्यात आले. प्रत्यक्षदर्शींनी सांगितला थरार वैष्णोदेवीचे दर्शन घेऊन परतणाऱ्या एका महिलेने सांगितले की, ट्रकला धडक बसताच बसमध्ये आग लागली. या अपघातात तिची मुलगी जखमी झाली असून, पती बेपत्ता असल्याचे तिने सांगितले. दुसऱ्या एका प्रवाशाने सांगितले की, धडकेच्या वेळी तो पत्नी आणि मुलासह झोपला होता. धडकेनंतर त्याची पत्नी खिडकीतून बाहेर फेकली गेली आणि बसजवळ अडकली. काही क्षणांतच त्या भागाला आग लागल्याने तिचा जागीच मृत्यू झाला.

## थोडक्यात

### मुंबईत पावसाचा कहर! मरीन ड्राईव्ह, अंधेरीत झाडे उन्मळून पडली

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** –मुंबईत बुधवारी (दि. १) सकाळपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसा सह सोसाट्याच्या वाऱ्यांमुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. शहरातील विविध भागांत पाणी साचणे, झाडे उन्मळून पडणे तसेच इमारतीचा भाग कोसळण्याच्या घटना घडल्या. मरीन ड्राइव्ह आणि अंधेरी येथे झाडे कोसळल्याच्या घटना घडल्या असून, सुदैवाने या दोन्ही घटनांमध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही. मरीन ड्राइव्हवर झाड कोसळल्याने वाहतूक विस्कळीत मुसळधार पाऊस आणि जोरदार वाऱ्यामुळे मरीन ड्राइव्ह परिसरात आज एक मोठे झाड उन्मळून पडले.

# खासदार श्रीकांत शिंदेंच्या ताफ्याला काळे झेंडे : नांदेडमध्ये संतप्त शिवसैनिकांची घोषणाबाजी



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – राज्यात उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेतील ६ खासदारांना आपल्या गळ्याला लावत एकनाथ शिंदेंनी ऑपरेशन टायगर यशस्वी केले आहे. त्यानंतर, शिवसेना उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी ६ मतदारसंघाचा दौरा करत, आता ऑपरेशन तुडवा सुरू करा असा आदेश शिवसैनिकांना दिला आहे. त्याच पार्श्वभूमीवर फुटीर खासदारांच्या मतदारसंघात काही ठिकाणी शिवसैनिक आक्रमक होताना दिसत असून आज नांदेडमध्ये ठाकरेंच्या शिवसैनिकांनी खासदार श्रीकांत शिंदेंच्या ताफ्याला काळे झेंडे दाखवत आपला विरोध दर्शवला. तर, सोशल मीडियातून देखील फुटीर खासदारांना विरोधाचा सामना करावा लागत आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे चिरंजीव तथा खासदार श्रीकांत शिंदे यांच्या ताफ्याला आज काळे झेंडे दाखवण्यात आले.

# देशातील २३ राजकीय पक्षाचे एसआयआर वरुन सरन्यायाधीशांना पत्र

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – देशातील २३ विरोधी पक्षांनी देशाच्या सरन्यायाधीशांना एक संयुक्त पत्र लिहून, निवडणूक आयोगाच्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरावलोकनावर (एसआयआर) आणि निवडणुकीशी संबंधित इतर मुद्द्यांवर चिंता व्यक्त केली आहे.

निवडणूक आयोगावर पक्षपातीपणाचा गंभीर आरोप केला आहे. हे पत्र ८ जून रोजी झालेल्या 'इंडिया' आघाडीतील २५ विरोधी पक्षांच्या बैठकीनंतर काही आठवड्यांतच आले आहे. त्या बैठकीत, पक्षांनी एकता कायम ठेवण्याची शपथ घेतली आणि एसआयआर व निवडणुकांच्या निष्पक्षतेच्या मुद्द्यावर सरन्यायाधीशांना संयुक्त पत्र पाठवण्याचा निर्णय घेतला.

यामध्ये द्रविड मुन्नेत्र कळघम, आम आदमी पार्टी आणि एका अपक्ष खासदारासारख्या 'इंडिया' आघाडीबाहेरील पक्षांचाही समावेश आहे.

दोन्ही पक्षांना 'इंडिया' आघाडीत परत आणण्याचा प्रयत्न या महिन्याच्या सुरुवातीला झालेल्या बैठकीला डीएमके आणि आप उपस्थित नसले तरी, आता दोन्ही पक्षांनी या संयुक्त पत्रावर स्वाक्षरी केली आहे.


तामिळनाडू विधानसभा निवडणुकीनंतर काँग्रेसने द्रमुक सोडून तामिळनाडू वेट्री कळघम सोबत आघाडी करण्याचा निर्णय घेतल्याचे कारण देण्यात आले.

# पोलीस उपनिरीक्षकाला कॅफेमध्ये केलेलं गैरवर्तन भोवलं

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**पुणे** – पुण्यातून एक खळबळजनक बातमी समोर आली आहे. पुण्यातील पोलीस उपनिरीक्षकाला एका कॅफेमध्ये केलेलं गैरवर्तन भोवले आहे. या गैरवर्तनाचा कथित व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर पोलीस उपनिरीक्ष संदीप कदम यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रात्रपाळीचे कर्तव्य बजावत असताना पुणे शहरातील शिरोळे रोडवरील एका कॅफेमध्ये प्रवेश करून ग्राहक आणि कर्मचाऱ्यांशी गैरवर्तन केल्याचा प्रकार समोर आला होता. दरम्यान हा सर्व प्रकार कॅफेमधील सिसिटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला होता. दरम्यान प्रकरणी डेक्कन पोलीस ठाण्यातील उपनिरीक्षक संदीप कदम यांना निलंबित करण्यात आले आहे. हातातील काठीने काउंटरवरील कॉफीचे ग्लास, खाद्य पदार्थ फेकले, कर्मचाऱ्यांशी अरेरावीची भाषा मिळालेल्या माहितीनुसार, सहा जूनला संदीप कदम हे रात्रपाळीवर कार्यरत होते. दरम्यान रात्रीच्या सुमारे पावणेदोनच्या सुमारास शिरोळे रोडवरील 'फ्लाइंग जिप्सी' कॅफेमध्ये ते गेले. त्या वेळी कॅफे बंद करण्याची तयारी सुरू होती. यावेळी कदम यांनी कॅफेत प्रवेश केला आणि हातातील काठीने कॅफेच्या काउंटरवरील कॉफीचे ग्लास आणि इतर खाद्य पदार्थ खाली पाडले. तसेच तेथे बसलेल्या ग्राहकांना तत्काळ उठून बाहेर जाण्यास सांगितले आणि कर्मचाऱ्यांशी अरेरावीची भाषा वापरली.






# बनावट औषधांच्या रॅकेटविरोधात 'मकोका' लावणार : मंत्री नरहरी झिरवाळ यांची परिषदेत ग्वाही

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – बनावट इंजेक्शन्स आणि औषधांची विक्री करणाऱ्या संघटित टोळ्यांविरुद्ध राज्य सरकार अत्यंत कठोर पावले उचलत आहे.

रिलायन्स लाइफ सायन्सेसच्या नावाने बनावट 'अल्ब्युरेल' इंजेक्शन तयार करून महाराष्ट्रात विकणाऱ्या आंतरराज्यीय रॅकेटचा पर्दाफाश झाला आहे. या प्रकरणी दोषींवर 'मकोका' अंतर्गत कारवाई करण्यात येईल, अशी ग्वाही राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी विधान परिषदेत केली. आमदार श्रीकांत भारतीय, विक्रांत पाटील, चित्रा वाघ आणि इतरांनी विचारलेल्या तारांकित प्रश्नाला उत्तर देताना झिरवाळ यांनी ही माहिती दिली.

झिरवाळ म्हणाले की, पुणे येथील मे. मैत्री फार्मास्युटिकल्स आणि मे. श्रीराम हेल्थकेअर येथे तपासणी केली असता, रिलायन्स लाईफ सायन्सेस कंपनीच्या नावाने बाजारात आलेला 'अल्ब्युरेल २० टक्के' इंजेक्शनचा साठा बनावट असल्याचे लॅब रिपोर्टमध्ये स्पष्ट झाले. पोलिसांनी येथून लाखो रुपयांचा बनावट साठा जप्त केला. नागपूरच्या मे. हितांशी फार्मास्युटिकल्सवर टाकलेल्या छाप्यातही हाच बनावट साठा आढळला. शासकीय विश्लेषक यांनी हे औषध पूर्णपणे बनावट असल्याचे घोषित केले आहे. विशेष म्हणजे, रिलायन्स लाईफ सायन्सेस कंपनीने आपण अशा कोणत्याही बॅचचे उत्पादन केले नसल्याचे लेखी स्पष्ट केले आहे. या औषधांच्या पुरवठा साखळीचे धागेदोरे इतर राज्यांशी जोडले गेल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. नवी मुंबईतील 'आरआरटी फार्मा'च्या चालकाने हे औषध दिल्लीतील दानिश खान याच्याकडून विना बिलाने खरेदी केले होते. तर दानिश खान याने हा माल चंदीगड (पंजाब) येथील राजकुमार मिश्रा याच्याकडून रोख स्वरूपात घेतला होता.

## विद्यार्थ्याचा करुण अंत

# चेंबूरमध्ये स्कूल बसवर झाड कोसळले



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – शाळकरी विद्यार्थ्यांना घरी घेऊन चाललेल्या एका व्हॅनवर झाड कोसळून चेंबूरमध्ये ११ वर्षीय विद्यार्थ्याचा मृत्यू झाला. या घटनेत चार विद्यार्थी गंभीर जखमी झाले असून आठ जण थोडक्यात बचावले.

दुपारचे वर्ग संपल्यानंतर 'युनिव्हर्सल हायस्कूल'च्या स्कूल व्हॅनने विद्यार्थी घरी जाण्यासाठी निघाले असता चेंबूर रोड नंबर ११ येथे या स्कूल व्हॅनवर पिंपळाचे झाड कोसळले. यावेळी व्हॅनमध्ये १३ विद्यार्थी होते. झाड कोसळल्याचे कळताच चालक व वाहकाने स्थानिकांच्या मदतीने विद्यार्थ्यांना बाहेर काढले आणि जवळील झेन रुग्णालयात दाखल केले. मात्र विहान श्रीवास्तव (११ वर्षे) याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेत ४ विद्यार्थी गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार चालू आहेत.

या घटनेमुळे चेंबूर परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. दरम्यान, हे झाड धोकादायक असल्याची तक्रार स्थानिकांनी केली होती, याबाबत चौकशी केली जाणार असून निष्काळजीपणा निदर्शनास आला तर संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असे महापौर रितू तावडे यांनी दिला. महापौर रितू तावडे यांनी घटनास्थळी भेट दिली, त्यावेळी त्या बोलत होत्या. मुंबईत सोमवारी रात्रीपासून पाऊस बरसत होता आणि मंगळवारीही पावसाचा जोर कायम होता. सतत बरसणाऱ्या पावसामुळे मुंबईत अनेक ठिकाणी झाड व झाडांच्या फांद्या कोसळण्याच्या घटना घडल्या. त्यातच दुपारी २.४५ च्या सुमारास चेंबूर, ५३८, हेरिटेज प्राईड, रोड क्रमांक ११ येथील 'युनिव्हर्सल हायस्कूल'च्या 'मेक फोर्स' कंपनीच्या स्कूल बसवर पिंपळाचे जुने झाड अचानकपणे कोसळले.

# विदर्भात कुठे पावसाचा कहर, तर कुठे दमदार पावसाची प्रतीक्षाच!

**बुलढाण्यात बानगंगा नदीला मोठा पूर, तर भंडाऱ्यात पावसाअभावी भात शेती धोक्यात**



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – राज्यभरात पुन्हा पावसाचा जोर वाढला आहे. बहुतांश ठकाणी दमदार पावसाने हजेरी लावली असली तरी काही ठिकाणी अद्यापही समाधानकारक पावसाची प्रतीक्षा आहे. तर राज्यातील पुढील पाच दिवस कोकण, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रात जोरदार पावसाचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तविला आहे. असे असताना विदर्भात मात्र काहीसे वेगळं चित्र पाहायला मिळत आहे. एकीकडे भंडारा जिल्ह्यात पावसाने हुलकावणी देण्यात आल्याने भात उत्पादक शेतकरी अडचणीत येण्याची शक्यता आहे. एल निनोच्या सावटामुळं भात उत्पादक शेतकरी चिंतेत सापडला आहे. तर दुसरीकडे बुलढाण्यातील मेहकर तालुक्यात तीन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे नदी नाल्यांना पूर आल्याचे चित्र आहे.

# काँग्रेस कमिटी तालुकाध्यक्षपदी राहुल बोडखे, शें.घाट पवन बेलसरे तर वरुडच्या अध्यक्षपदी मनिष कुबडे

(प्रतीनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – तालुका काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी राहुल बोडखे याची पुनर्नियुक्ती, वरुड शहर काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी मनिष कुबडे व शे.घाट शहराध्यक्ष पवन बेलसरे यांची निवड झाली आहे. या नियुक्ती तिघांचेही सर्वत्र अभिनंदन केल्या जात आहे.

मनिष कुबडे व पवन बेलसरे हे दोन्ही नवनियुक्त अध्यक्ष हे पक्षासाठी एकनिष्ठपणे काम करणारे कार्यकर्ते आहेत. राहुल बोडखे यांनी तालुक्यातील ग्रामीण भागात काँग्रेसचा पाया मजबूत करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत तर मनिष कुबडे यांनी शहरात युवकांना संघटित करुन पक्षवाढीसाठी मोलाचे योगदान दिले आहे. वरुडच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी शुभेच्छा संदेशात म्हटले की, दोन्ही अध्यक्षांच्या नेतृत्वाखाली वरुड तालुका व शहर काँग्रेस अधिक मजबूत होईल. सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी ते कटिबद्ध राहतील, असा विश्वास आहे.

या निवडीमुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून वरुड काँग्रेसला नवी दिशा मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे राजेंद्र सोनुले, प्रदीप बहुरुपी, पवन बेलसरे, जुबेर शहा, सुनील काकडे, डॉ.मनोज उमेकर, प्रशांत राऊत, मारोतरावं धुर्वे, विजय युवनाते, तानाजी नाकट, रंजना मस्की, स्वाती बहुरुपी, शिल्पा पवार, विद्या, प्रमिला दाभाडे यांनी प्रामुख्याने अभिनंदन केले आहे.

# राज्यात प्रशासकीय फेरबदल! ३ वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**मुंबई** – राज्यातील ३ वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश प्रशासनाकडून जारी करण्यात आले आहेत. सामान्य प्रशासन विभागाकडून अधिकृतपणे जाहीर करण्यात आलेल्या या नवीन नियुक्तीनुसार नांदेड, लातूर आणि मुंबई येथील महत्त्वपूर्ण पदांवर नवीन सनदी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

महेश पाटील – मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड वरिष्ठ सनदी अधिकारी महेश पाटील यांची आता नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदी नियुक्ती करण्यात आली आहे. नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील विकासकामांचा वेग वाढवणे, जिल्हा परिषदेच्या अंतर्गत येणाऱ्या आरोग्य, शिक्षण आणि पायाभूत सुविधांचा दर्जा सुधारणे, तसेच शासकीय योजनांचा लाभ तळागाळातील सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवणे ही अत्यंत महत्त्वाची जबाबदारी आता त्यांच्यावर असणार आहे. त्यांच्या प्रशासकीय अनुभवाचा फायदा नांदेड जिल्ह्याच्या ग्रामीण विकासाला मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

राहुल कुलकर्णी – आयुक्त, लातूर महानगरपालिका राहुल कुलकर्णी यांची लातूर महानगरपालिकेच्या आयुक्तपदी बदली करण्यात आली आहे. लातूर शहराचा विस्तार आणि तेथील वाढत्या नागरी समस्या पाहता ही नियुक्ती महत्त्वाची मानली जात आहे.

राज्यात प्रशासकीय फेरबदल! ३ वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या महाराष्ट्र शासनाने प्रशासकीय पातळीवर मोठे फेरबदल करत राज्यातील ३ वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी केले आहेत. यामध्ये नांदेड जिल्हा परिषद, लातूर महानगरपालिका आणि मुंबईतील सहकारी मार्केटिंग फेडरेशनच्या नवीन नियुक्तींचा समावेश आहे.

# अल्पवयीन मुलाने टेम्पो चालवून ४ वाहनांना दिली धडक

**पुण्यातील हडपसरमध्ये ऐन गर्दीच्या वेळी घडला प्रकार**

(प्रतीनीधी वरुड दर्पण)

**पुणे** – पुण्यात एक धक्कादायक घटना घडली आहे. एका १७ वर्षांच्या अल्पवयीन मुलाने टेम्पो चालवून चार वाहनांना धडक दिल्याचा प्रकार घडला आहे. पुण्यातील हडपसर भागात ऐन गर्दीच्या वेळी हा प्रकार घडल्याने काही काळ भीतीचं वातावरण निर्माण झालं होतं. दरम्यान, यामध्ये कोणीही जखमी झाले नसले तरी वाहनांची नुकसान झाल्याची माहिती मिळत आहे.

पोलिसांच्या सुचनेला न जुमानता हा टेंपो वेगाने पुढे निघाला टेम्पो पॉइंट दरम्यान पोलिसांनी चक ४२



अठ ४२४६ या क्रमांकाचा टेम्पो थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांच्या सुचनेला न जुमानता हा टेंपो वेगाने पुढे निघाला. यावेळी चार वाहनांना या टेम्पोने धडक दिली. टेम्पो थांबल्यानंतर लोकांनी या १७ वर्षांच्या टेम्पो चालकाला चोप दिला आणि पोलिसांच्या हवाली केलं. त्यानंतर टेम्पोच्या मालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# विश्वास नांगरे पाटील यांना नागपूर काँग्रेससह विरोधी पक्षांकडून संविधानाची प्रत भेट

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**नागपूर** – संघाच्या कार्यक्रमात हजेरी लावणाऱ्या विश्वास नांगरे पाटील यांच्या पोलिसिंग बद्दल संशय व्यक्त करणाऱ्या काँग्रेस आणि इतर काही संघटनांनी त्यांना संविधानाची प्रत भेट म्हणून दिली आहे.

यावेळी नागपुरात पोलीस आयुक्त म्हणून संविधानांप्रमाणेच कार्य करण्याचा सल्ला देखील यावेळी त्यांना देण्यात आला आहे. काँग्रेससह भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, आम आदमी पक्ष, जय विदर्भ पार्टी अशा विविध राजकीय पक्ष आणि संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी विश्वास नांगरे पाटील यांची भेट घेतली. यावेळी नागपूरचे पोलीस आयुक्त म्हणून विश्वास नांगरे पाटील माझा एन्काऊंटर करतील, असा खळबळजनक आरोप करणाऱ्या नागपूर काँग्रेस शहर अध्यक्ष प्रफुल्ल गुडधे पाटील यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने विश्वास नांगरे पाटील यांची पोलीस भवन येथे भेट घेतली. 'संघ समजून घ्यायचा असेल तर त्यांनी आमची मदत घ्यावी' 'आम्ही नागपूरचे आहोत, म्हणून तुमच्या तुलनेत संघाला आम्ही जास्त चांगल्या पद्धतीने आणि जवळून ओळखतो. त्यामुळे नांगरे पाटील यांना संघ समजून घ्यायचा असेल तर त्यांनी आमची मदत घ्यावी' असा सल्ला ही काँग्रेस नेत्यांनी दिला आहे. विश्वास नांगरे पाटील सर्वांना परिचित असलेले व्यक्ती आहेत, तरुणाईमध्ये त्यांचे विशेष आकर्षण आहे, आणि राष्ट्रीय स्वंयसेवक संघ त्यांच्या याच प्रसिद्धीचा फायदा उचलू पाहत आहे, असा आरोपही यावेळी काँग्रेस नेत्यांनी केला आहे.

**जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा वघाळ येथे**

# शाळा शुभारंभ प्रसंगी नवागतांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – मोठ्या स्वप्नांकडे जाणारी छोटी पाऊले आज शाळा शुभारंभ दिन आत्मविश्वासाने शाळेत आली.

शिक्षणाचा नवीन प्रवास सुरु करणाऱ्या पहिलीतील नवागत विद्यार्थ्यांचे जंगी स्वागत तालुक्यातील सर्व शाळांमध्ये झाले. जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा वघाळ येथे ३० जुन रोजी उत्साहात शाळा शुभारंभ सोहळा संपन्न झाला. नवागतांचे पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांनी स्वागत करुन शुभेच्छा दिल्या.

शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्या संगीता पोहणे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या शाळा शुभारंभ सोहळ्याला पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा वघाळ येथे शाळेच्या पहिल्याच दिवशी नवागतांचे गोड पदार्थ देऊन स्वागत करण्यात आले.

सर्व विद्यार्थ्यांना मोफत शालेय दप्तर,गणवेश व पाठ्यपुस्तकांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. मुख्याध्यापक प्रकाश विंचूरकर यांनी शाळा शुभारंभ दिनी शुभेच्छा देत वर्षभर राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची यावेळी माहिती दिली.

कार्यक्रमाचे संचालन शिक्षिका रंजना परतेती यांनी केले तर प्रास्ताविक जेष्ठ शिक्षक देवानंद बागडे यांनी केले. उपस्थितांचे आभार मेघा खोपे यांनी मानले.

## संपादकीय

### आपले ध्येय ठरवा, आणि त्यासाठी मेहनत करा.

### मुंबईचे खरे शिल्पकार : नामदार नाना शंकरशेठ आणि मराठी अस्मितेचा उदय

मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीने घेतलेला ठराव क्रमांक ४८ हा केवळ एका प्रशासकीय मंजुरीचा किंवा कागदोपत्री निधीचा तुकडा नाही. तो एका प्रदीर्घ आणि अन्यायी विस्मृतीवर मुंबईने मिळवलेला ऐतिहासिक विजय आहे. नामदार जगन्नाथ ऊर्फ नाना शंकरशेठ यांच्या स्मारकासाठी निधी मंजूर होणे, ही घटना मुंबईच्या मराठी अस्मितेच्या पुनरुत्थानाची नांदी आहे. हा निर्णय केवळ एका भव्य भौतिक इमारतीच्या उभारणीपुरता मर्यादित नसून, ज्या महापुरुषाने आधुनिक मुंबईचा पाया रचला, त्याला त्याच्याच कर्मभूमीत हक्काचे स्थान देण्याचा कृतज्ञता सोहळा आहे. अनेक दशकांपासून मुंबईच्या इतिहासलेखनातून ज्या मराठी माणसाचे योगदान पद्धतशीरपणे बाजूला सारले गेले किंवा दुर्लक्षित राहिले, त्या नानांना आता मुंबईने खऱ्या अर्थाने 'घरी' आणण्याची, त्यांच्या विचारांचे स्मारक उभे करण्याची वेळ आली आहे. विस्मृतीच्या अंधारातून कृतज्ञतेच्या प्रकाशाकडे इतिहास हा अत्यंत निर्दयी असतो, असे म्हटले जाते; पण त्याहूनही निर्दयी असते ती समाजाची 'कृतघ्न विस्मृती'. ज्या शहरात नानांनी आपले संपूर्ण आयुष्य, अफाट संपत्ती आणि बुद्धी पणाला लावून संस्थात्मक जीवनाचा पाया रचला, त्याच शहरात त्यांच्या एका स्मारकासाठी मराठी माणसाला आणि त्यांच्या वंशजांना इतकी वर्षे संघर्ष करावा जावा, ही मोठी शोकांतिका होती. मुंबई ही केवळ व्यापारी, उद्योगपती किंवा परकीय राज्यकर्त्यांनी घडवली, हा एक अत्यंत चुकीचा आणि एकांगी समज पसरवला गेला होता. या खोट्या मांडणीला छेद देण्याचे काम महानगरपालिकेच्या या निर्णयाने केले आहे. नाना शंकरशेठ यांचे स्मारक उभे राहणे म्हणजे केवळ एक पुतळा उभा करणे नव्हे. तर ती मुंबईच्या सामूहिक स्मृतीला दिलेली एक संजीवनी आहे. हा निर्णय हे सिद्ध करतो की, मुंबईच्या गगनचुंबी इमारतींच्या आणि आर्थिक प्रगतीच्या खाली असलेला मजबूत पाया हा एका द्रष्ट्या मराठी माणसाच्या दूरदृष्टीने रचलेला आहे. आधुनिक मुंबईचे खरे भाग्यविधाते नाना शंकरशेठ (१८०३-१८६५) यांच्या कार्याचा आवाका पाहिला, तर थक्क व्हायला होते. आज आपण ज्या आधुनिक, प्रगत आणि प्रगतीशील मुंबईचा अभिमान बाळगतो, त्या मुंबईतील प्रत्येक महत्त्वाच्या संस्थेच्या जन्मामागे नानांचे नाव जोडलेले आहे. शिक्षणाची गंगोत्री: महाराष्ट्रात आणि विशेषतः मुंबईत आधुनिक इंग्रजी शिक्षणाची सुरुवात नानांनी केली. 'बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना करून त्यांनी स्थानिक लोकांना शिक्षणाची दारे खुली केली. एलफिन्स्टन कॉलेज, ग्रँट मेडिकल कॉलेज (जेथे त्यांनी मृतदेहांच्या विच्छेदनाला होणाऱ्या विरोधाविरुद्ध लढा दिला), आणि मुलींची पहिली शाळा सुरू करण्यात नानांचा सिंहाचा वाटा होता. रेल्वेचे जनक: आशिया खंडातील पहिली रेल्वे १८५३ मध्ये बोरीबंदर ते ठाणे अशी धावली.

# दिखाऊ नात्यात दडलेली मानवी क्रूरता!



प्रेम, दया आणि करुणा हे शब्द समाजात आजही संवेदनशीलता जिवंत असल्याचा केवळ भास निर्माण करतात. मात्र, अलीकडच्या काळात या मूल्यांची ज्या प्रकारे पायमल्ली होत आहे, ते चित्र अत्यंत विदारक आणि धक्कादायक आहे. अशीच एक समाजमनाला सुन्न करणारी घटना विद्येचे माहेरघर असलेल्या पुणे शहरात घडली. नातेवाईकांच्या मध्यस्थीने आलेले स्थळ आणि त्यावरुन वडिलांनी ठेवलेला विश्वास आज केतनच्या आयुष्यावर बेतल्याचे दुर्दैवी चित्र समोर येत आहे. पुण्यासारख्या महानगरातील अफाट श्रीमंती, व्यवसायातील संचालक पद आणि समाजात असलेली प्रतिष्ठा या सगळ्या गोष्टींना कवडीमोल ठरवत, सियाने आपल्या दिखाऊ भावनिकतेच्या आधारावर मानवी क्रूरतेचे हिडीस दर्शन घडवले. कुटुंबात प्रचंड आर्थिक ऐश्वर्य असतानाही, एखादा तरुण स्वतःच्या आवडी निवडी बाजूला ठेवून केवळ आई-वडिलांच्या समाधानासाठी अरेंज मॅरेज ला होकार देतो, हाच त्याच्यावरील उच्च संस्कारांचा पुरावा असतो. केतननेही तेच केले. वडिलांनी सुचवलेले स्थळ त्याने आदराने स्वीकारले आणि फक्त एकच भाबडा प्रश्न विचारला, बाबा, तुम्ही मुलीची वैयक्तिक आणि कौटुंबिक पार्श्वभूमी नीट तपासून पाहिली आहे ना? वडिलांच्या सकारात्मक आश्वासनावर पूर्ण विश्वास ठेवून केतनने आपल्या सुखी संसाराचे स्वप्न पाहण्यास सुरुवात केली. विश्वास आणि नात्याची पवित्रता केंद्रस्थानी ठेवून केतनने या बंधनाचा स्वीकार केला.

कोणत्याही नात्याच्या सुरुवातीला एकमेकांना समजून घेण्यासाठी, ॲडजस्ट होण्यासाठी थोडा वेळ हा लागतोच. केतनने सुद्धा नेमकी हीच समजदारी दाखवली. सियाला आपल्यासोबत जुळवून घेता यावे म्हणून त्याने स्वतःच्या वर्तनातून कमालीची नम्रता आणि समजूतदारपणा दाखवला. तो सियाला पुरेसा वेळ देऊ लागला, कारण त्याचे तिच्यावर निस्वार्थ प्रेम होते. दोघामध्ये वारंवार होणारी भांडणे, दिवसांनुदिवस वाढणारा अबोला आणि एकमेकांमध्ये निर्माण होणारी अस्वस्थता हे सर्व संकेत जणू काही ओरडून सांगत होते की, या नात्याचा पुढील प्रवास आता थांबवायला हवा. पण, केतनला हे नातं टिकवायचं होतं. दोघांमधील अंतर दूर व्हावे म्हणून दोन्ही कुटुंबांनी आणि विशेषतः केतनने जंगजंग पछाडले, पराकोटीचे प्रयत्न केले. हळूहळू परिस्थिती बदलली आणि दोघेही आनंदात राहू लागले. पण, हा आनंद म्हणजे एका मोठ्या वादळापूर्वीची भयानक शांतता होती, याची पुसटशी कल्पनाही केतनला नव्हती. देखाव्याचा खेळ आणि कटकारस्थान दोघांमधील नातं सुधारत असल्याचा केवळ एक देखावा सियाने निर्माण केला होता. केतनचा आणि त्याच्या कुटुंबाचा विश्वास संपादन करुन, तिच्या डोक्यात एक वेगळाच कट शिजत होता. एकीकडे सियाचा हा कपटी देखावा सुरु असताना, दुसरीकडे मात्र केतनचे सियाप्रती असलेले निस्वार्थ प्रेम आणि भावनिक बंध अधिक घट्ट होत होते. महागडे गिफ्ट्स देणेघेणे, प्री-वेडिंग शूटिंग मोठ्या थाटात साजरी करणे या सगळ्यात दोघांच्याही चेहऱ्यावर हसू उमटत होते. पण हे हसू मनातून आलेले नव्हते, तर तो एका नाट्यमय प्रदर्शनाचा भाग होता, असा भास आता होऊ लागला होता. एका बाजूला केतनची निष्पाप प्रामाणिकता होती, तर दुसऱ्या बाजूला सियाचे केवळ प्रदर्शन ! एखादी व्यक्ती आपल्यावर जिवापाड प्रेम करत असताना, आपण जर समोरच्या व्यक्तीच्या निस्वार्थ भावनांशी खेळत असू, तर यापेक्षा मोठे पाप जगात कोणतेही नाही. सिया केतनसोबत राहत होती खरी, पण तिचे मन मात्र चेतन नावाच्या दुसऱ्याच व्यक्तीशी जुडले होते. केतन हा तिच्यासाठी केवळ समाजाला दाखवण्याचा एक मुखवटा होता, तर तिच्या आयुष्याचा खरा नायक चेतन होता. चार भिंतींआडची क्रूरता वरवर दिसणारे हे सुखी चित्र फार काळ टिकू शकले नाही. सियाचे ते दिखाऊ प्रेम आणि काळजी म्हणजे क्रूरतेवर पांघरलेला मुखवटा होता. समाजासमोर अत्यंत सुसंस्कृत, सुशिक्षित आणि सभ्य राहणारी सिया, चार भिंतींच्या आड केतनच्या आत्मसन्मानाचे धिंडवडे काढत होती. तिचा हा मानसिक छळ बाहेर कोणालाही दिसत नव्हता. आपल्या श्रीमंती आणि प्रतिष्ठेच्या बळावर तिने केतनला अशा चक्रव्यूहात पकडले, जिथून त्याला बाहेर पडण्याचा कोणताही मार्ग उरला नाही. शेवटी, तिची ती लपलेली मानवी क्रूरता उघडी पडलीच. पण तोपर्यंत खूप उशीर झाला होता. अखेर सियाच्या डोक्यात सुरू असलेल्या डावाला १८ जून रोजी यश आले आणि पुण्यातील लोहगड किल्ल्यावरून ढकलून देत केतन चा दुर्दैवी मृत्यू झाला. सियाच्या या कपटी डावामुळे एका निष्पाप, प्रामाणिक तरुणाचा हसताखेळत आयुष्य होत्याचे नव्हते झाले. सियाच्या या कृत्यामुळे केवळ केतनचाच मृत्यू नव्हे तर त्याचं अख्ख कुटुंब अपंग झालं.

प्रेम हे जगातील सर्वात सुंदर आणि पवित्र बंधन मानले जाते. परंतु, स्वतःच्या प्रेमासाठी दुसऱ्याचा जीव घेणे, याला प्रेम म्हणता येत नाही. हा केवळ तीव्र स्वार्थ आणि मानसिक विकृती आहे. जर सियाचे चेतन वर प्रेम होते, तर तिने हिंमत दाखवून लग्नाला नकार द्यायला हवा होता. घरच्यांना याविषयी माहिती द्यायला हवी होती. संवाद साधून मार्ग काढण्याऐवजी दुसऱ्याला मृत्यूच्या दरीत लोटणे, हे नात्यांमधील संवेदनशीलता संपल्याचे लक्षण आहे आणि हेच सियाने केले. या एका कृत्यामुळे केवळ केतन संपला नाही, तर दोन सुशिक्षित आणि प्रतिष्ठित कुटुंबे उद्ध्वस्त झाली. दोघांच्याही पालकांना समाजात मान वर करून जगणे कठीण झाले. आपण संस्कारांमध्ये कुठे कमी पडलो ? हा प्रश्न त्यांना आयुष्यभर छळत राहील. समाजाचाही नात्यांवरून आणि विश्वासावरून भरवसा उडून जातो. तात्पुरत्या रागाच्या भरात किंवा अविचाराने घेतलेला एक निर्णय संपूर्ण आयुष्य अंधारात ढकलतो. सियाने कदाचित शांत सद्सदविवेक बुद्धीने विचार केला असता तर आज ही परिस्थिती निर्माण झाली नसती. शेवटी अशा हैवान वृत्तीला पोलीस कोठडी, न्यायालय आणि पश्चात्ताप याशिवाय हातात काहीही उरत नाही. प्रेम, विवाह म्हणजे केवळ दोन व्यक्तींचे लग्न नव्हे, तर दोन जीवांचे, दोन कुटुंबांचे आणि दोन भिन्न विचारधारांचे पवित्र मिलन असते. त्याग, समजूतदारपणा आणि परस्-परांबद्दलचा आदर या त्रिसूत्रीवर आपली विवाह संस्था शतकानुशतके भक्कमपणे टिकून आहे. परंतु, आजच्या आधुनिक आणि गतिमान युगात विवाहाचे हे पारंपरिक चित्र झपाट्याने बदलताना दिसत आहे. तरुण पिढीमधील वाढती प्रेमप्रकरणे आणि त्यातून घडणाऱ्या काही विदारक, दुर्दैवी घटना समाजमनाला सुन्न करणाऱ्या आहेत. आजचा तरुण वर्ग विवाहाकडे एक सुंदर कौटुंबिक प्रवास म्हणून न पाहता, जीवनातील एक मोठा रिस्क फॅक्टर म्हणून पाहत आहे. लग्न टिकेल की नाही?, विचार पटतील की नाही? अशी अनामिक भीती आजच्या तरुण-तरुणींच्या मनात घर करून बसली आहे, हे आजचे कटू वास्तव आहे. ही एकूणच परिस्थिती पाहिली की मनात एक गंभीर प्रश्न निर्माण होतो की, आपल्या थोर महापुरुषांनी दिलेले विवेकी विचार, जीवनमूल्ये आणि त्यांनी केलेला संघर्ष आपण विसरत चाललो आहोत का? आपल्यातील नैतिकता, आदरभाव आणि सुसंस्कृतपणा हळू-हळू लोप पावत चालला आहे की काय, अशी शंका येते. म्हणूनच, आजच्या तरुण पिढीला अशा कौटुंबिक आणि सामाजिक संकटांतून बाहेर काढण्यासाठी शालेय आणि कौटुंबिक स्तरावर मूल्यशिक्षणाची अत्यंत गरज निर्माण झाली आहे. हाडांची काडे आणि रक्ताचे पाणी करुन आई-वडील आपल्या पाल्यांना शिकवतात, मोठे करतात.

त्यांच्या डोळ्यांत मुलांच्या उज्ज्वल भविष्याची स्वप्ने असतात. परंतु, आजची काही मुले माय-बापाच्या कष्टाची जाणीव न ठेवता, त्यांनी दाखवलेल्या विश्वासाचा गैरफायदा घेतात. क्षणिक मोहापाई प्रेमाचे आभासी विश्व निर्माण करुन वाहवत जातात, ही खरोखरच चिंताजनक बाब आहे. आयुष्य फार सुंदर आहे आणि ते सुंदरतेनेच जगले पाहिजे. आजच्या मुलामुलींनी दुसऱ्यांच्या आयुष्याशी खेळणं बंद करावं, दिखाऊ नात्यांचं आयुष्य फार नसतं काळाच्या ओघात त्यांचा खरा चेहरा आणि वास्तव समोर आल्याशिवाय राहत नाही. नाती जोडायची असतील तर ती मनापासून आणि प्रामाणिकपणे जोडा. खोटेपणाचा डोलारा उभा करण्यापेक्षा, दोन शब्दांतलं खरं आणि स्पष्ट नातं कधीही श्रेष्ठ ठरतं.



प्रा.वैभव जिचकार
आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ.
९१३०४५१९४९

# महाकर्जमुक्तीच्या पलीकडचा विचार

महाराष्ट्राच्या कृषी इतिहासात काही निर्णय हे केवळ प्रशासकीय निर्णय म्हणून नोंदले जात नाहीत, तर ते शासनाच्या व्यापक दृष्टिकोनाचे प्रतीक ठरतात. राज्य शासनाने नुकतीच जाहीर केलेली 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' ही अशाच प्रकारची योजना आहे. ही योजना केवळ कर्जमाफी देणारी योजना नसून शेतकऱ्याला आर्थिक स्थैर्य, नव्याने पतपुरवठा आणि शाश्वत शेतीच्या दिशेने नेणारा एक महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून पाहिली जात आहे.

२०१४ मध्ये राज्याचे मुख्यमंत्रीपद भूषवल्यापासून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शाश्वत शेतीचा पुरस्कार केला आहे. महाराष्ट्रातील शेती आजही मोठ्या प्रमाणावर निसर्गावर अवलंबून आहे. दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट, महापूर, हवामानातील अनिश्चितता आणि उत्पादन खर्चातील वाढ या अनेक कारणांमुळे शेतकरी वारंवार आर्थिक संकटात सापडतो. अशा परिस्थितीत कर्ज हा शेतीचा अविभाज्य भाग बनतो. परंतु जेव्हा हे कर्ज परतफेडीच्या क्षमतेपलीकडे जाते, तेव्हा त्याचे रूप आर्थिक विवंचनेत बदलते. त्यामुळे शेतकऱ्याला दिलासा देण्यासाठी शासनाने यापूर्वीही विविध कर्जमुक्ती योजना राबवल्या होत्या. मात्र या वेळी शासनाने केवळ कर्जमुक्तीचा विचार न करता भविष्यात शेतकरी पुन्हा त्याच परिस्थितीत अडकणार नाही यासाठी व्यापक दृष्टीकोन स्वीकारला आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव या योजनेला देण्यात आले आहे, यालाही विशेष महत्त्व आहे. लोककल्याणकारी शासन, जलसंधारण, सिंचन व्यवस्था, ग्रामीण विकास आणि रयतेच्या हिताचा सातत्याने विचार करणाऱ्या अहिल्यादेवींच्या कार्याचा आदर्श आजही प्रेरणादायी आहे. त्यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षात शेतकरी कल्याणाशी निगडित या योजनेला त्यांचे नाव देऊन शासनाने इतिहासातील लोकाभिमुख परंपरेला अभिवादन केले आहे.

या योजनेचा सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे तिची रचना. यापूर्वी अनेकदा असे होत असे की दोन लाख रुपयांच्या मर्यादेपेक्षा थोडी जास्त थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांना कोणताही लाभ मिळत नसे. एखाद्या शेतकऱ्याचे कर्ज दोन लाख दहा हजार रुपये असले तरी तो संपूर्णपणे अपात्र ठरत असे. त्यामुळे अनेक पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहत होते. यावेळी शासनाने ही त्रुटी दूर केली आहे. दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांनी अतिरिक्त रक्कम भरल्यानंतर दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती शासनाकडून मिळणार आहे. त्यामुळे हजारो शेतकऱ्यांना नव्याने कर्ज घेण्याचा आणि शेती उभी करण्याचा मार्ग खुला होणार आहे.




या योजनेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचा सन्मान. अनेकदा चर्चेत केवळ थकीत कर्जदार येतात; मात्र वेळेवर कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांनाही प्रोत्साहन मिळणे आवश्यक असते. ही बाब लक्षात घेऊन शासनाने पन्नास हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याचा निर्णय घेतला आहे. आर्थिक शिस्त राखणाऱ्या आणि प्रामाणिकपणे कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी हा मोठा दिलासा आहे.

योजनेचा आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे एकवेळ समझोता योजना अर्थात वन टाइम सेटलमेंट (ओटीएस). अनेक शेतकऱ्यांची थकबाकी दोन लाख रुपयांपेक्षा अधिक असल्याने ते संपूर्ण कर्जमुक्तीच्या चौकटीत बसत नव्हते. आता अशा शेतकऱ्यांना अतिरिक्त रक्कम भरण्यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. त्यामुळे तातडीचा आर्थिक भार कमी होऊन त्यांना नियोजनबद्ध पद्धतीने कर्जमुक्तीचा लाभ घेता येणार आहे.

मात्र या योजनेचा सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे तिच्यामागील शासनाची व्यापक भूमिका. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील शासनाने ही बाब स्पष्टपणे मांडली आहे की, वारंवार कर्जमाफी देणे हे अंतिम समाधान नाही. शेतकरी पुन्हा कर्जाच्या चक्रात का अडकतो, त्याचे उत्पन्न स्थिर का राहत नाही आणि शेती आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम कशी होईल, याचा अभ्यास करण्यासाठी उच्चाधिकार समितीची स्थापना करण्यात आली होती. त्या समितीच्या शिफारशींमधून शेतकऱ्यांच्या दीर्घकालीन सक्षमीकरणाचा मार्ग शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

यामध्ये सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे तो शाश्वत शेतीचा. प्रत्येक शेतापर्यंत सिंचन सुविधा पोहोचणे, पाण्याचे सक्षम व्यवस्थापन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शेती उत्पादन खर्च कमी करणे, योग्य बाजारपेठ उपलब्ध करून देणे आणि वेळेवर पतपुरवठा करणे या गोष्टींवर शासनाचा भर आहे. कर्जमुक्ती हा त्यातील एक भाग आहे; परंतु भविष्यात कर्जमाफीची गरजच भासू नये अशी परिस्थिती निर्माण करणे हा त्यामागचा मोठा उद्देश आहे. राज्यातील सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार असून जवळपास ३६ हजार ५०० कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात येणार आहे. महाराष्ट्राच्या इतिहासातील ही सर्वात मोठी कर्जमुक्ती योजना मानली जात आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करून शासनाने शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचा संदेश दिला आहे. योजनेची अंमलबजावणीही पूर्णपणे ऑनलाइन आणि पारदर्शक पद्धतीने करण्यात येणार आहे. आधार प्रमाणीकरण, बँकांमधील माहितीची पडताळणी आणि तंत्रज्ञानाधारित प्रक्रिया यामुळे लाभ योग्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यास मदत होणार आहे.

■ प्रवीण टाके
उपसंचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर
९७०२८५८७७७

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# उद्धव ठाकरेंना आणखी एक धक्का!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – शिवसेना (ठाकरे) पक्षाला मंगळवारी (दि. ३०) आणखी एक राजकीय धक्का बसला. पक्षाचे नेते आणि विधान परिषदेचे आमदार सचिन अहिर यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केला. या प्रवेशानंतर त्यांनी महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापतीपदासाठी महायुतीचे अधिकृत उमेदवार म्हणून उमेदवारी अर्जही दाखल केला. उपसभापतीपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल शिंदे गटात प्रवेश केल्यानंतर सचिन अहिर यांनी विधान परिषदेच्या उपसभापतीपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार उपस्थित होत्या. उद्धव ठाकरे यांना आणखी एक धक्का मुंबईतील राजकारणात प्रभावी नेतृत्व म्हणून ओळख असलेले सचिन अहिर हे उद्धव ठाकरे यांचे निकटवर्तीय मानले जात होते.

# आदित्य ठाकरेंची राजकीय नाकेबंदी : उपमुख्यमंत्री शिंदेंकडून अहिर यांना बळ

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांचे अत्यंत विश्वासू मानले जाणारे आमदार सचिन अहिर यांना विधान परिषदेच्या उपसभापतीपदावर बसवण्याची तयारी करून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेच्या वरळी मतदारसंघात आदित्य ठाकरेंची राजकीय नाकेबंदी करण्याची खेळी केल्याचे मंगळवारी स्पष्ट झाले. अहिर यांना सत्तेतील पदाच्या माध्यमातून बळ देत २०२९ च्या विधानसभा निवडणुकीत आदित्य ठाकरे




यांच्यासमोर आव्हान उभे करण्याचा प्रयत्न शिंदे यांनी केला आहे.

अहिर यांनी २०१९ च्या विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर शिवसेनेत प्रवेश केला होता. त्यावेळी अहिर हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या मुंबई विभागीय अध्यक्षपदावर होते. उद्धव ठाकरे यांनी हाती शिवबंधन बांधून अहिर यांचे पक्षात स्वागत केले होते. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत वरळीतून अहिर यांचा पराभव करून निवडून आलेल्या सुनील शिंदे यांनी २०१९मध्ये आदित्य यांच्यासाठी वरळी मतदारसंघ सोडला होता. सुनील शिंदेनी घेतलेली माघार आणि अहिर यांची साथ यामुळे २०१९ च्या निवडणुकीत आदित्य ठाकरे वरळीतून मोठ्या मताधिक्याने निवडून आले होते.

आदित्य ठाकरे यांच्यासाठी वरळीवर पाणी सोडणाऱ्या सुनील शिंदे आणि अहिर यांची नंतर पक्षाने विधान परिषदेवर वर्णी लावली. सचिन अहिर हे जुलै २०२२ मध्ये विधानपरिषदेवर निवडून गेले होते.

# आधी त्रुटी सुधारा, नंतरच कारवाई!

**पहिलीच चूक करणाऱ्या व्यावसायिकांसाठी सरकारचे नियम शिथिल**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – ग्राहक व्यवहार विभागाने कायदेशीर मापनशास्त्र कायदा, २००९ अंतर्गत 'सुधारणा नोटीस' ही नवीन पद्धत सुरू केली आहे. यामुळे व्यावसायिक पहिल्यांदा होणाऱ्या प्रक्रियात्मक चुका सुधारू शकणार आहेत. त्यांना त्वरित दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागणार नाही.

सरकारने 'व्यवसाय सुलभता' मोहिमेचा भाग म्हणून 'जन विश्वास (तरतुदी सुधारणा) कायदा, २०२६' द्वारे हे बदल



घडवून आणले आहेत. या नवीन पद्धतीनुसार, जेव्हा एखादा कायदेशीर मापनशास्त्र अधिकारी पहिल्यांदाच झालेली प्रक्रियात्मक किंवा नियमनविषयक चूक शोधून काढेल, तेव्हा तो संबंधित व्यावसायिक घटकाला 'सुधारणा नोटीस' बजावेल.

या नोटीसमध्ये त्रुटी नमूद करून ती सुधारण्यासाठी वाजवी कालावधी दिला जाईल. जर संबंधित घटकाने दिलेल्या वेळेत त्रुटी सुधारली, तर दंडात्मक कारवाई टाळता येणार आहे.

विभागाने स्पष्ट केले की, जर एखाद्याने 'सुधारणा नोटीस'चे पालन केले नाही किंवा पुन्हा तीच चूक केली, तर कायद्यानुसार कडक कारवाई करण्यात येईल. हा सुधारित नियम उत्पादक, आयातदार, पॅकर्स, विक्रेते, दुरुस्ती करणारे व्यावसायिक, व्यापारी आणि सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना लागू असेल.

सरकारने स्पष्ट केले की, या यंत्रणेमुळे ग्राहकांचे संरक्षण किंवा अंमलबजावणी कमकुवत होणार नाही. ग्राहकांच्या हितावर प्रतिकूल परिणाम करणाऱ्या कृत्यांविरुद्ध कारवाई सुरूच राहणार आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांची बनावट स्वाक्षरी

**मंजुरी आदेश तयार केल्याप्रकरणी नगरसेवकाला अटक**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**गडचिरोली** – जिल्हा खनिकर्म प्रतिष्ठानचे लेटरहेड वापरून तसेच जिल्हाधिकाऱ्यांची बनावट स्वाक्षरी करून प्रशासकीय मंजुरीचे खोटे आदेश तयार केल्याप्रकरणी गडचिरोली पोलिसांनी एका नगरसेवकाला अटक केली आहे. या कारवाईमुळे राजकीय वतुर्ळात प्रचंड खळबळ उडाली आहे.

जिल्हा खनिकर्म अधिकारी इम्रान शेख यांनी काही दिवसांपूर्वी पोलिसांत तक्रार दाखल केली होती. काही अज्ञात व्यक्तींनी जिल्हाधिकाऱ्यांची बनावट स्वाक्षरी करून आणि जिल्हा खनिकर्म प्रतिष्ठानच्या लेटरहेडचा गैरवापर करून विकासकामांचे खोटे प्रशासकीय मंजुरी आदेश तयार केल्याचे या तक्रारीत म्हटले होते. या बनावट आदेशांद्वारे विविध विकासकामांसाठी निधी मंजूर झाल्याचे भासवून हे दस्तावेज काही व्यक्ती आणि कार्यालयांमध्ये फिरवण्यात आले होते.

धरपकड या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला होता. तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त माहितीच्या आधारे, पोलिसांनी रविवारी चामोर्शी नगरपंचायतीचे नगरसेवक आशिष पिपरे यांना छत्रपती संभाजीनगर येथून ताब्यात घेतले.

# श्रीकांत शिंदे आणि ओमराजे निंबाळकरांच्या केंद्रीय मंत्रिपदाची जोरदार चर्चा

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आजच दिल्ली गाठण्याची शक्यता**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – दुसऱ्यांदा ठाकरेंच्या शिवसेनेला खिंडार पाडून सहा खासदार फोडल्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं दिल्लीमध्ये वजन वाढलं आहे. केंद्रीय मंत्रिमंडळ फेरविस्तारामध्ये शिवसेना शिंदे गटाला कॅबिनेट मंत्रीपदासह आणखी एक मंत्रीपद मिळेल अशी चर्चा रंगली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर आज (१ जुलै) एकनाथ शिंदे यांचा दिल्ली दौरा होणार असल्याची चर्चा आहे.केंद्रीय मंत्रिमंडळ विस्तारासंदर्भात यांचा हा दिल्ली दौरा असल्याचं बोललं जात आहे. खासदार श्रीकांत शिंदे आणि ओमराजे निंबाळकर यांनी हे केंद्रीय



मंत्रीपदाची शपथ घेणार असल्याची चर्चा सुद्धा जोरात रंगली आहे. या सर्व पार्श्वभूमीवरच हा शिंदे यांचा दौरा होत असल्याची सूत्रांनी माहिती दिली आहे.

किती मंत्र्यांची सुट्टी होऊ शकते? धर्मेंद्र प्रधान (केंद्रीय शिक्षण मंत्री): देशातील राष्ट्रीय प्रवेश परीक्षांच्या कथित पेपर लीक वादामुळे धर्मेंद्र प्रधान यांच्यावर प्रचंड राजकीय दबाव आहे. त्यामुळे या फेरबदलात त्यांची मंत्रिमंडळातून सुट्टी होऊ शकते, असे मानले जात आहे. हरदीप सिंह पुरी (पेट्रोलियम मंत्री): हरदीप सिंह पुरी यांनाही मंत्रिमंडळातून वगळले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पक्ष संघटना किंवा अन्य जबाबदारीसाठी त्यांच्या नावाचा विचार केला जाऊ शकतो.

# ...तर मतदानावरील विश्वास उडेल : आमदार रोहित पवार यांची भीती

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**पुणे** – विरोधी पक्षातील नेत्यांना आणि लोकप्रतिनिधींना फोडून लोकशाहीची पायमल्ली करण्याचा प्रयत्न भाजप आणि सत्ताधारी महायुतीकडून केला जात असून, यामुळे जनतेचा लोकशाहीवरील आणि मतदानावरचा विश्वास उडू शकतो, अशी भीती राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रोहित पवार यांनी मंगळवारी व्यक्त केली. अशा प्रकारचे फोडाफोडीचे राजकारण सुरू राहिल्यास २०२९ नंतर या देशामध्ये संविधान शिल्लक राहील की



नाही, अशी शंका घेण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे, असा गंभीर आरोप त्यांनी पत्रकार परिषदेत केला.

रोहित पवार म्हणाले, जेव्हा महाविकास आघाडी किंवा विरोधी पक्षांची ताकद कमी केली जाते, तेव्हा ती केवळ पक्षाची ताकद नसून सामान्य जनतेची ताकद कमी केली जाते. सरकार सध्या चेहरे आणि पैसा बघून नियुक्त्या करत असून, यामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असल्याचा दावा त्यांनी केला. भाजपला २०२९ च्या 'डिलिमिटेशन' कायद्याद्वारे लोकसभा आणि विधानसभेचे मतदारसंघ स्वतःला हवे तसे डिझाइन करायचे आहेत, जेणेकरून त्यांचे मतदान वाढेल.

पक्षात दोन गट पडल्याच्या चर्चांना पूर्णविराम देताना रोहित पवार म्हणाले की, सत्तेत सहभागी होणे किंवा काँग्रेसमध्ये विलीन होणे याबद्दल कोणतीही अधिकृत चर्चा झालेली नाही,. शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष आपल्या विचारांशी ठाम असून, कोणताही खासदार पक्ष सोडून जाणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# एआय नियमावलीसाठी तज्ज्ञ समिती नेमणार

**गृहराज्यमंत्री योगेश कदम यांची माहिती**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय आधारित स्मार्ट गॉगल्स आणि स्मार्ट ग्लासेसच्या वापराबाबत तसेच संवेदनशील ठिकाणी त्यांच्या नियंत्रणासाठी मार्गदर्शक तत्त्वे ठरविण्यात येणार असून त्यासाठी लवकरच एक समिती नेमण्यात येणार आहे. या समितीचा अहवाल केंद्र सरकारकडे पाठविण्यात येणार असल्याची माहिती गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी मंगळवारी विधानसभेत लक्षवेधी



सूचनेच्या उत्तरात दिली.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या सना मलिक यांनी याबाबतची लक्षवेधी सूचना मांडली होती. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित स्मार्ट गॉगल्स, स्मार्ट ग्लासेस आणि इतर अत्याधुनिक उपकरणे मोठ्या प्रमाणावर बाजारात उपलब्ध झाली असून या उपकरणांद्वारे फोटो, व्हिडीओ, ध्वनिमुद्रण, थेट प्रसारण, चेहरा ओळख, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने व्यक्तींची ओळख, संभाषणांचे विश्लेषण तसेच विविध प्रकारची वैयक्तिक माहिती संकलित करणे शक्य होत आहे. ही उपकरणे सामान्य चष्म्यांप्रमाणे दिसत असल्यामुळे संबंधित व्यक्तींच्या नकळत त्यांचे चित्रण अथवा ध्वनिमुद्रण केले जाऊ शकते, असे सना मलिक यांनी सांगितले. याबाबत देशातील विविध सुरक्षा तज्ज्ञांनी अशा उपकरणांच्या वापराबाबत योग्य नियमन, सुरक्षा प्रोटोकॉल तयार करावेत.

**स्व.माणिकलालजी गांधी जागृत विद्यालय येथे**

# शाळा प्रवेश आणि सहविचार सभा संपन्न



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्व.माणिकलालजी गांधी जागृत विद्यालय वरुड येथे शाळा प्रवेश उत्सव आणि सहविचार सभा माणिकलालजी गांधी जागृत विद्यालय वरुड येथे करण्यात आले होते. शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मध्ये महाराष्ट्र राज्यभर विशेषता विदर्भातील सर्व प्रकारच्या प्राथमिक माध्यमिक शाळा ३० जून २०२६ पासून सुरु होत असल्याने मुख्याध्यापक विजय आडे यांनी सर्व शिक्षक शिक्षिका आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांची महत्त्वाची सभा घेऊन सभेत शासनाच्या आदेशानुसार शाळा प्रवेश उत्सव बाबत नियोजन आयोजन आणि वर्षभरातील नियोजन करताना उपक्रम कार्यक्रम याविषयी सुसंवाद साधण्यात आला.

आडे यांनी मोलाचे मार्गदर्शन करताना म्हणाले की वर्ग ५ ते १० पर्यंत विद्यार्थी आणि शिक्षक व पालक तसेच समाज यात जनसंपर्क सकारात्मक वातावरण निर्माण करुन सर्वांगीण विकास शाळेची गुणात्मक बौद्धिक, सामाजिक सांस्कृतिक प्रगती कसा होईल याकडे विशेष लक्ष वधले. । सभेतील संचलन पर्यवेक्षिका माधुरी मेश्राम तर आभार उपमुख्याध्यापक प्रदीप पाटील यांनी मानले.

**सोने-चांदीचे दर**

शुध्द सोने –९६१०८१० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने – ९४,७०० रु.(१०ग्रॅम)

चांदी – १,३०,००० रु. (प्र.किलो)

**कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती**

**बाजारभाव ( क्विंटलमध्ये )**

| | | |
|---|---|---|
| ज्वारी – | १६५० – | २००० |
| गहू – | २५०० – | ३००० |
| तूर – | ६१०० – | ६३९० |
| मूग – | ६५०० – | ७००० |
| उडीद – | ६००० – | ७००० |
| हरभरा – | ५६०० – | ५९०० |
| सोयाबिन – | ४१०० – | ४३५० |
| बाजरा – | २००० – | २३०० |
| तिळ – | ८२०० – | ९३०० |
| भुईमूग – | ५१५० – | ५३५० |
| मका – | २२०० – | २३०० |

**डॉ.माधवराव पानसे विद्यालयात**

# विद्यार्थ्यांचा शाळा प्रवेशोत्सव आणि वाढदिवस संपन्न

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्थानिक डॉ.माधवराव पानसे विद्यालयात ३० जूनला शैक्षणिक सत्र २०२६–२७ च्या शुभारंभ प्रसंगी विद्यार्थ्यांचा शाळा प्रवेशोत्सव व शहरातील जेष्ठ व्यापारी संतोषकुमार अग्रवाल यांचेसह इतरांचा वाढदिवस उत्साहात संपन्न झाला.

यावेळी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते शालेय पाठ्यपुस्तके व शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. वरुड शहरातील प्रतिष्ठित



व्यापारी संतोष अग्रवाल, टेंभुरखेडा येथील प्रतिष्ठित नागरिक सुरेश पेठे आणि शाळेतील लिपिक संजय होले यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. त्यांचे तर्फे शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.

या सोहळ्याला अध्यक्ष म्हणून संस्थेचे सचिव जी.टी.तायवाडे तर प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध बालरोगतज्ञ डॉ.कमलकिशोर भुतडा, राजस्थानी सेवा समितीचे उपाध्यक्ष तथा माजी नगरसेवक संजय कानुगो, टेंभुरखेडाचे उपसरपंच राजेंद्र सोनुले, संजय बांबल आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक नितीन ठाकरे तर संचालन सहाय्यक शिक्षक देवेंद्र धोटे यांनी केले. कार्यक्रमाला शाळेतील विद्यार्थी, पालक आणि शिक्षक उपस्थित होते.

### जळगाव स्थानकावर मोठा अनर्थ टळला!

# धावत्या अमृतसर एक्सप्रेसच्या जनरेटर बोगीला आग

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**जळगाव** – रेल्वे स्थानकावर बुधवारी सकाळी एक मोठा अनर्थ थोडक्यात टळला. मुंबईहून अमृतसरकडे धावणाऱ्या अमृतसर एक्स्प्रेसच्या जनरेटर बोगीच्या ब्रेक डिस्कला अचानक आग लागल्याने काही काळ स्थानकावर गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. धुराचे मोठे लोट बाहेर पडताना पाहून प्रवाशांमध्ये एकच घबराट पसरली. अनेक प्रवासी बोग्यांमधून बाहेर पडण्यासाठी धावपळ करू लागले. मात्र रेल्वे कर्मचाऱ्यांच्या आणि तांत्रिक अधिकाऱ्यांच्या तत्परतेमुळे काही मिनिटांतच आग आटोक्यात आली आणि संभाव्य मोठा अपघात टळला. जळगाव स्थानकावर मोठा अनर्थ टळला ही घटना बुधवारी सकाळी सुमारे सात वाजण्याच्या सुमारास घडली. मुंबईहून अमृतसरकडे जाणारी ११०५७ अमृतसर एक्स्प्रेस जळगाव रेल्वे स्थानकावर दाखल झाली होती. याचवेळी रेल्वे रुळाला लागलेली एक चावी उडून डीव्हीला आदळली. त्यामुळे एअर प्रेशर अचानक रिलीज झाले.

### पत्नीच्या त्रासाला कंटाळून पतीची आत्महत्या

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नाशिक** – नाशिकमध्ये एक धक्कादायक घटना समोर आली आहे. पत्नीच्या त्रासाला कंटाळून एका २७ वर्षीय तरुणाने आत्महत्या केल्याचे समोर आले आहे. वर्षभरापूर्वीच लग्नबंधनात अडकलेला अनिकेत बाळासाहेब जगताप (वय २७) याने पत्नी श्रुती धिवरेला कंटाळून आत्महत्या केली आहे. या घटनेनं परिसरात खळबळ उडाली असून जगताप कुटुंबियांवर आभाळ कोसळलं आहे. नाशिकच्या मालेगाव कॅम्प भागातील साने गुरुजी नगरात अनिकेत बाळासाहेब जगताप राहत होता. अनिकेतचा वर्षभरापूर्वी मोठ्या उत्साहात पंचशील नगरातील श्रुती धिवरे या तरुणीशी विवाह झाला होता.

# बळीराजाच्या स्वाभिमानाला नवे बळ!

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – राज्याची अर्थव्यवस्था, ग्रामीण विकास आणि सामाजिक जीवनाची वीण ही शेती व शेतकऱ्यांच्या अथक परिश्रमांवर उभी आहे. निसर्गाची अनिश्चितता, अवकाळी पाऊस, दुष्काळ, बाजारभावातील चढ-उतार आणि वाढता उत्पादन खर्च अशा असंख्य संकटांचा सामना करत अन्नदाता आपल्या कर्तव्याशी प्रामाणिक राहतो. याच भावनेतून महाराष्ट्र शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६' जाहीर केली आहे.

ही योजना केवळ कर्जमाफीची घोषणा नसून, शेतकऱ्यांच्या स्वाभिमानाला बळ देणारे, ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी गती देणारे आणि शेती क्षेत्रात नवचैतन्य निर्माण करणारे एक ऐतिहासिक पाऊल आहे.

महाराष्ट्रात दरवर्षी १ जुलै हा दिवस 'कृषी दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि हरित क्रांतीचे प्रणेते स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जातो. आधुनिक शेती, सिंचन, पीकपद्धतीतील बदल आणि कृषी विकासाच्या दूरदृष्टीपूर्ण धोरणांमुळे त्यांनी महाराष्ट्राला अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबनाच्या दिशेने नेले. 'शेतकरी समृद्ध झाला तरच राज्य समृद्ध होईल,' हा त्यांचा दूरदर्शी विचार आजही तितकाच प्रेरणादायी आहे.

# अमरावती ग्रामीण पोलीस दलातील २१ अधिकारी-अंमलदारांचा सेवागौरवाने निरोप : शाल, स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सन्मान

### पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या हस्ते सत्कार

### कर्तव्यनिष्ठ सेवेला सलाम करत भावी आयुष्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





**अमरावती** – अमरावती ग्रामीण पोलीस दलातील नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या २१ पोलीस अधिकारी व अंमलदारांचा निरोप व सत्कार समारंभ मंगळवारी (दि.३० जून) सायंकाळी ५.३० वाजता अमरावती येथील सत्कार मंथन हॉलमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. पोलीस अधीक्षक निकेतन कदम (भा.पो.से.) यांच्या हस्ते सेवानिवृत्त अधिकारी व अंमलदारांचा शाल, श्रीफळ, मा. पोलीस महासंचालकांचे स्मृतिचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.

सत्कार समारंभात सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रदीर्घ, प्रामाणिक आणि कर्तव्यनिष्ठ सेवेचा गौरव करण्यात आला. यावेळी पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी आपल्या मनोगतात, पोलीस दलात बजावलेल्या उल्लेखनीय सेवेबद्दल सर्व सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक करत त्यांच्या निरोगी, आनंदी आणि समृद्ध भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या समारंभात पोलीस स्टेशन दत्तापूरचे संजय शंकरराव उदासी, मंगरूळ दस्तचे साहेबराव विठ्ठलराव ठावरे, अंजनगाव सुर्जीचे शिवचरण श्रीरामजी मडमे, नियंत्रण कक्षाचे विनोद पांडुरंगजी धमाळे, पन्नोट पोलीस स्टेशनचे दिनेशकुमार नानासाहेब तायडे, नियंत्रण कक्षाचे देवेंद्रकुमार लक्ष्मणराव श्रीखंडे, पोलीस मुख्यालयाचे दिनेश भिमराव इंगोले, रहिमापूर पोलीस स्टेशनचे बाबुराव कृष्णराव लुटे, बेनोडा पोलीस स्टेशनचे दिलीप वासुदेवराव भोयर, जिल्हा वाहतूक शाखेचे दिपक कचरूजी साबळे, सरमसपुरा पोलीस स्टेशनचे प्रकाश पंजाबराव काळे, लोणी पोलीस स्टेशनचे महादेव अमृतराव शेंडे, कुहा पोलीस स्टेशनचे रामेश्वर रामराव चव्हाण, शिरजगाव पोलीस स्टेशनचे राजेंद्र हिरामणजी सोनवणे, मोर्शी पोलीस स्टेशनच्या श्रीमती नंदा सतीशराव सावरकर, वरूड पोलीस स्टेशनचे सुनील रंगराव अकोलकर, बी.डी.डी.एस.चे विजयसिंग फतुसिंग राठोड, शेंदुरजनाघाट पोलीस स्टेशनचे गजानन रामचंद्र धमाळे, धारणी पोलीस स्टेशनचे राजकुमार बुधाजी कोरे, रहिमापूर पोलीस स्टेशनचे बबन श्यामराव मात्रे तसेच बिनतारी संदेश विभागाचे गजानन रामदास रूमकर यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला अमरावती ग्रामीण पोलीस दलातील अधिकारी, कर्मचारी, सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. 'सेवेचा गौरव, योगदानाचा सन्मान' या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात उपस्थितांनी सेवानिवृत्त अधिकारी व अंमलदारांच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव करून त्यांना भावी आयुष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. आवश्यक असल्यास ही बातमी वृत्तपत्र शैली, टीव्ही न्यूज स्क्रिप्ट किंवा सोशल मीडियासाठीही रूपांतरित करून देता येईल

# विनापरवानगी 'आयव्हीएफ सेंटर' चालवणाऱ्यांवर मकोका लावणार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – राज्यात वाढत असलेली विनापरवाना 'इन-व्हिट्रो फर्टिलायझेशन' (आयव्हीएफ) केंद्रे, बेकायदेशीर सोनोग्राफी आणि गर्भलिंग निदानाच्या गैरप्रकारांवर राज्य सरकारने आता अत्यंत कठोर पावले उचलण्याचे नियोजन केले आहे. रुग्णांच्या जिवाशी खेळणारे आणि या व्यवसायाच्या आड संघटित रॅकेट चालवणाऱ्या गुन्हेगारांना जरब बसवण्यासाठी विद्यमान कायद्यांमध्ये सुधारणा केली जाणार आहे. 'विनापरवाना आयव्हीएफ केंद्रे चालवणे आणि बेकायदेशीर गर्भलिंग निदान करणे यांसारख्या गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्यांवर 'मकोका' (महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा) अंतर्गत कारवाई करण्याची तरतूद पुढील अधिवेशनात केली जाईल,' अशी घोषणा आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी बुधवारी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात केली. समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी राज्यात बोकाळलेल्या बेकायदेशीर आयव्हीएफ आणि सोनोग्राफी केंद्रांच्या माध्यमातून होणाऱ्या गैरप्रकारांचा मुद्दा सभागृहात उपस्थित केला होता. त्यावर उत्तर देताना आरोग्यमंत्र्यांनी ही घोषणा केली. आबिटकर यांनी सांगितले की, गर्भधारणापूर्व आणि प्रसूतिपूर्व निदान तंत्र कायद्याची राज्यात कठोर अंमलबजावणी केली जाईल. यासोबतच, आयव्हीएफ आणि सोनोग्राफी केंद्रांच्या तपासणीसाठी, तसेच त्यांच्या नियमित सनियंत्रणासाठी राज्यात एक 'विशेष कृती दल' (टास्क फोर्स) स्थापन करण्यात येईल.

# पाणीपुरवठ्याच्या तक्रारीत ९६ टक्के वाढ : पर्जन्य जलवाहिन्यांच्या तक्रारी ८८ टक्क्यांनी वाढल्या

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – नागरिकांच्या तक्रारीत ५९ टक्क्यांनी, पाणीपुरवठ्याच्या तक्रारीत ९६ टक्के तर पर्जन्य जलवाहिन्यांच्या तक्रारीत ८८ टक्के वाढ झाल्याचे 'प्रजा फाऊंडेशन'च्या अहवालातून समोर आले आहे.

'प्रजा फाऊंडेशन'ने मंगळवारी प्रसिद्ध केलेल्या 'मुंबईतील नागरी सेवा, पर्यावरण व हवामान बदल २०२६' या अहवालात मुंबईतील नागरी सेवांमध्ये काही क्षेत्रांत लक्षणीय सुधारणा झाल्याचे नमूद करण्यात आले असले, तरी कचरा व्यवस्थापन, सांडपाणी प्रक्रिया, पाण्याची गुणवत्ता आणि पर्यावरणीय निकषांच्या अंमलबजावणीत गंभीर त्रुटी कायम असल्याचे स्पष्ट झाले आहे. 'प्रजा'च्या अहवालानुसार, २०१६ ते २०२५ या कालावधीत मुंबईतील नागरिकांच्या तक्रारींमध्ये ५९ टक्क्यांनी वाढ झाली असून, तक्रारींची संख्या ८१,५५५ वरून १ लाख ३० हजार ६६ इतकी झाली आहे.

त्यात विशेषतः घनकचरा व्यवस्थापनाशी संबंधित तक्रारींमध्ये ५३१ टक्के, तर घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या कामकाजाबाबत २८१ टक्क्यांनी वाढ झाली आहे. सांडपाणी व्यवस्थापनाशी संबंधित तक्रारींमध्ये ९६ टक्के, तर पर्जन्यजल निचरा व्यवस्थेतील तक्रारींमध्ये ८८ टक्क्यांनी वाढ झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.


**जाहीर नोटीस**

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.आय.जे.ठाकरे, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५००/२०२६** **ने.ता.२९/०७/२०२६**

**अर्जदार :-** १) अरुण महादेव मनोहरे, वय अं.६५ वर्ष, धंदा-मजुरी, २) भिमराव महादेव मनोहरे, वय अं.६० वर्ष, धंदा-मजुरी, क्र.१ व २ रा.वडाळा, ता.वरुड, ३) श्रीमती कलावती शालीकराव जोगे, वय अं.७५ वर्ष, धंदा- गृहिणी, रा.जळेगांव (शामजीपंत), ४) सौ.पंचफुला उपासराव कठाणे, वय अं.६८ वर्ष, धंदा- गृहिणी, रा.तारासावंगा, ता.नरखेड, जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत महादेव बाकाराम मनोहरे व मयत गिरजा महादेव मनोहरे, रा.वडाळा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२९/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२०/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

**जाहीर नोटीस**

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.एम.डी.सैंदाणे साहेब, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५३५/२०२६** **ने.ता.३०/०७/२०२६**

**अर्जदार :-** १) नरेंद्र रामेश्वर खंडेलवाल, वय अं.६३ वर्ष, धंदा-व्यवसाय, २) शरद रामेश्वर खंडेलवाल, वय अं.६१ वर्ष, धंदा-व्यवसाय, ३) दिनेश रामेश्वर खंडेलवाल, वय अं.५९ वर्ष, धंदा-व्यवसाय, ४) सौ.वर्षा संजयकुमार खंडेलवाल, वय अं.५५ वर्ष, धंदा- गृहीणी, रा.टोपे नगर, अमरावती, ५) श्रीमती शोभा महेंद्र खंडलेवाल, वय अं.६० वर्ष, धंदा- गृहिणी, ६) मोहीत महेंद्र खंडलेवाल, वय अं.३३ वर्ष, धंदा- व्यवसाय, अर्जदार क्र.१ ते ३ व ५ व ६ रा.वार्ड क्र.३ वरुड, ७) सौ.मेघा आकाश जैन, वय अं.३७ वर्ष, धंदा- गृहीणी, रा.श्रीफर निवास, नागपूर, ८) सौ.प्रिया अर्पन झुनझुनवाला, वय अं.३५ वर्ष, धंदा- गृहीणी, रा.झुनझुनवाला हॉस्पीटल, आकाशवाणी स्क्वेअर, औरंगाबाद

**... विरुध्द ...** **गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **नामे मयत रामेश्वर राधाकिसन खंडेलवाल व मयत सावित्रीबाई रामेयश्वर खंडेलवाल, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.३०/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२५/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

**जाहीर नोटीस**

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.एम.डी.सैंदाणे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५३८/२०२६** **ने.ता.३०/०७/२०२६**

**अर्जदार :-**

भाऊराव विठ्ठलराव निस्वादे
वय अं.७१ वर्ष, धंदा-शेती
रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत विठ्ठलराव भानजी निस्वादे व मयत भारती उर्फ शेवंताबाई विठ्ठलराव निस्वादे, रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.३०/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२५/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**





# 'स्वर्गरथ' विषयी गैरसमज, अंधश्रद्धा आणि चुकीच्या समजुती

## स्वर्गरथ चालकाला करावी लागते कसरत : अडगळीच्या ठिकाणी करावा लागतो उभा

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**वरुड** – एखाद्या व्यक्तीचा जन्म जितका अटळ आहे, तितकेच मृत्यूही अटळ सत्य आहे. माणसाच्या आयुष्याच्या शेवटच्या प्रवासात त्याला सन्मानाने निरोप मिळावा, या उदात्त भावनेतून वरुड शहरात अनेक ठिकाणी स्वर्गरथाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

मात्र, दुर्दैवाने आजही काही नागरिकांमध्ये असलेल्या गैरसमज, अंधश्रद्धा आणि चुकीच्या समजुतींमुळे ही समाजोपयोगी सुविधा अनेक ठिकाणी अडगळीच्या ठिकाणी ठेवावी लागत आहे. माझे घरासमोर ठेवु नका, रस्त्यावर ठेवु नका, माझे डोळयासमोर ठेवु नका, आमचा स्पर्श होईल अशा ठिकाणी ठेवु नका, भुत झोंबते, आम्ही आंघोळ करुन, फ्रेश मंदीरात येतो आणि ते अपशकुन दिसते, शिळी पाहुन मुलं भितात, असे सांगत अनेक नागरिक या स्वर्गरथाला जणु अपशकुन समजुन





'समाजाने विज्ञाननिष्ठ आणि विवेकपूर्ण विचारांचा स्वीकार करणे गरजेचे आहे'. अंधश्रद्धेला बळी न पडता स्वर्गरथासारख्या समाजहिताच्या सुविधांना स्विकारणे महत्वाचे आहे, स्वर्गरथ आणि अंधश्रध्दा यांचा कुठेही संबंध नाही, समज –गैरसमज मनातून काढून अशा समाजपयोगी कार्याला सहकार्य करावे, असे आवाहन अंधश्रध्दा निर्मुन समितीचे कमलाकर देशमुख यांनी केले आहे.

चालकाला मात्र हेलपाटे घालायाला लावतांना दिसुन येत आहे. त्यामुळे आता कोणी टोकू नये म्हणुन शहरातील अडगळीची जागा शोधुन त्या ठिकाणी स्वर्गरथ उभा करण्याची पाळी चालकांवर येवुन ठेपली आहे.

स्वर्गरथ हा कोणत्याही प्रकारचा अपशकुन नसून, तो मृत व्यक्तीचे पार्थिव सन्मानाने स्मशानभूमीपर्यंत पोहोचविणारे वाहन आहे. अनेक गरीब आणि गरजू कुटुंबांसाठी ही सेवा मोठा आधार ठरु शकते. तरीही 'स्वर्गरथ वापरल्यास अशुभ होते' किंवा 'त्याचा वापर करणे योग्य नाही' अशा निराधार गैरसमजुतींमुळे हा स्वर्गरथ उभा करावा तरी कुठे? असा प्रश्न चालक आणि या स्वर्गरथ नागरिकांच्या सुविधेसाठी उपलब्ध करुन देणाऱ्या दानदात्यांना पडला आहे.

समाजाने विज्ञाननिष्ठ आणि विवेकपूर्ण विचार



स्वर्गरथामुळे कोणताही अपशकून किंवा अशुभ घडत नाही. उलट, दुःखाच्या प्रसंगी ही सेवा अनेक कुटुंबांना मोठा आधार देते. त्यामुळे नागरिकांनी गैरसमज दूर करून या समाजोपयोगी सुविधेला सहकार्य करावे. प्रशासन आणि सामाजिक संस्थांनीही स्वर्गरथाबाबत जनजागृती करून नागरिकांच्या मनातील गैरसमज दूर करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन दुर्गा माता मंदीर स्वर्गरथाचे चालक मयूर तडस यांनी केले आहे.



स्वर्गरथ ही केवळ पार्थिव वाहतुकीची सेवा आहे. तिचा शुभ-अशुभ किंवा अपशकुनाशी कोणताही संबंध नाही. समाजातील अंधश्रद्धा आणि गैरसमज बाजूला ठेवून नागरिकांनी या सुविधेचा स्वीकार करावा. गरजू कुटुंबांसाठी ही सेवा मोठा आधार ठरते. नागरिकांनी विवेकाने विचार करून स्वर्गरथासारख्या समाजहिताच्या उपक्रमांना सहकार्य करण्याचे आवाहन स्व.शिवरामजी हिवसे अध्यापक महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.किशोर तडस यांनी केले.

स्विकारण्याची गरज आहे. प्रशासन, सामाजिक संस्था आणि लोकप्रतिनिधींनी स्वर्गरथाबाबत जनजागृती करून नागरिकांचे गैरसमज दूर करणे आवश्यक आहे. समाजाच्या पैशातून किंवा दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने उपलब्ध झालेली ही अत्यंत महत्वपुर्व सुविधा 'गरज सरो वैद्य मरो', अशा विचारांनी प्रेरीत होतांना दिसुन येत आहे.

मृत व्यक्तीचा सन्मान राखणे ही आपली सामाजिक आणि मानवी जबाबदारी आहे. स्वर्गरथ ही त्याच जबाबदारीची पूर्तता करणारी सेवा आहे.

त्यामुळे गैरसमजांना बाजूला ठेवून अशा प्रकारे गैरसमज निर्माण करुन मनातील आणि डोक्यातील अंधश्रध्दा बाहेर काढणे, हाच खऱ्या अर्थाने समाजहिताचा आणि मानवतेचा मार्ग ठरेल.

# अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणी आरोपीला २० वर्षांची सक्तमजुरी

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**ठाणे** - एका अल्पवयीन मुलीवर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी ठाण्यातील विशेष न्यायालयाने एका ३० वर्षीय व्यक्तीला २० वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा सुनावली आहे. कायद्यानुसार अल्पवयीन मुला-मुलींची संमती निरर्थक ठरते, असे स्पष्ट निरीक्षण नोंदवत न्यायालयाने बचाव पक्षाचा प्रेमसंबंधांचा युक्तिवाद फेटाळून लावला. विशेष पोक्सो न्यायालयाचे न्यायाधीश प्रेमल विठलानी यांनी सोमवारी धनेश्वर ऊर्फ धुळेश्वर पुजीयालाल कलासुवा याला वारंवार



बलात्कार आणि पोक्सो कायद्याच्या अंतर्गत दोषी ठरवले. दरम्यान, न्यायालयाने कलासुवा याला अपहरणाच्या आरोपातून मुक्त केले. पीडित मुलगी तिच्या कुटुंबापासून वाचण्यासाठी आणि लग्न करण्याच्या उद्देशाने स्वतःच्या इच्छेने आरोपीसोबत राजस्थानमधील त्याच्या गावी गेली. त्यामुळे फूस लावून नेणे हा अपहरणाचा कायदेशीर घटक या प्रकरणात दिसून येत नाही, असे न्यायालयाने नमूद केले.





